**मुख्य लेखापाल संवर्गातून कार्यालय अधिक्षक, गट-ब (राजत्रित) संवर्गात पदोन्नती देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**महसूल व वन विभाग,**

**शासन आदेश क्रमांक: एमएफएस-०९.२५/प्र.क्र.११८/ वने-८**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

**दिनांक : ०८ मे, २०२६**

**शासन आदेश :-**

सन २०२४-२५ वर्षाच्या निवडसूचीमधून मुख्य लेखापाल संवर्गातून कार्यालय अधिक्षक, गट-ब (राजत्रित) संवर्गात सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात खालील पदावर पदोन्नतीने पदस्थापना देण्यात येत आहे.

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव व पदनाम | वाटप केलेला महसूल विभाग | पदस्थापनेचे पद |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | श्रीमती संगीता अरुण काळे, मुख्य लेखापाल, सामाजिक वनिकरण विभाग , रायगड, अलिबाग | कोकण-२ | कार्यालय अधिक्षक, उपवनसंरक्षक, रोहा वनविभाग |
| २ | श्री. अजयकुमार बाबुराव सांगळे, मुख्य लेखापाल, शहापूर वनविभाग | कोकण-२ | कार्यालय अधिक्षक, मुख्य वनसंरक्षक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली |
| ३ | श्री. प्रकाश पांडुरंग बाहीकर, मुख्य लेखापाल, प्रादेशिक नाशिक | नाशिक | कार्यालय अधिक्षक,उपवनसंरक्षक, जळगाव वनविभाग |
| ४ | श्री. चंद्रकात लोटन सोनजे, मुख्य लेखापाल, ठाणे वनविभाग | कोकण-२ | कार्यालय अधिक्षक,उपवनसंरक्षक, ठाणे वनविभाग |
| ५ | श्रीमती भारती बबनराव सोनवणे, मुख्य लेखापाल, प्रादेशिक, छत्रपती संभाजीनगर | छत्रपती संभाजीनगर | कार्यालय अधिक्षक,उपवनसंरक्षक, छत्रपती संभाजीनगर |

| | | | |
|---|---|---|---|
| ६ | श्री. पुंडलीक बसवाणी सुतार, मुख्य लेखापाल, प्रादेशिक कोल्हापूर | नागपूर | कार्यालय अधिक्षक, उपवनसंरक्षक, वडसा वनविभाग |
| ७ | श्री. सुधीर धनराज बडघरे, मुख्य लेखापाल, पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर | नागपूर | कार्यालय अधिक्षक, उपवनसंरक्षक, सिरोंचा वनविभाग |
| ८ | श्री. रणजित नामदेव पाटील, मुख्य लेखापाल, प्रादेशिक कोल्हापूर | पुणे | कार्यालय अधिक्षक, संचालक, कुंडल वन प्रशासन विकास व व्यवस्थापन प्रबोधिनी, कुंडल |
| ९ | श्री. प्रदिप पुंडलिक भोस्कर, मुख्य लेखापाल,प्रादेशिक नागपूर | नागपूर | कार्यालय अधिक्षक, उपवनसंरक्षक, आलापल्ली वनविभाग |
| १० | श्री. श्रीराम मानिक गि-हेपुंजे, मुख्य लेखापाल, गोंदीया वनविभाग | नागपूर | कार्यालय अधिक्षक, उपवनसंरक्षक, भामरागड वनविभाग |
| ११ | श्री. सुधाकर किशोरराव क्षिरसागर, मुख्य लेखापाल, सामाजिक वनिकरण विभाग, भंडारा | नागपूर | कार्यालय अधिक्षक, उपवनसंरक्षक, गोंदिया वनविभाग |
| १२ | श्री. सचिन शिवाजीराव जावळे, मुख्य लेखापाल, छत्रपती संभाजीनगर वनविभाग | नागपूर | कार्यालय अधिक्षक, उपवनसंरक्षक, वर्धा वनविभाग |
| १३ | श्री. सिध्दार्थ दामोदर गुळवे, मुख्य लेखापाल, वन्यजीव विभाग छत्रपती संभाजीनगर | नागपूर | कार्यालय अधिक्षक, वनसंरक्षक, वाहतुक विपणन विभाग, बल्लारशहा |
| १४ | श्रीमती रुपाली अरुणराव सरोदे, मुख्य लेखापाल,सामाजिक वनिकरण छत्रपती संभाजीनगर | अमरावती | कार्यालय अधिक्षक, वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण विभाग, अमरावती |

**२.** वरील मुख्य लेखापालांना निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात खालील अटींच्या अधीन राहून कार्यालय अधिक्षक, गट-ब (राजत्रित) संवर्गात पदोन्नती देण्यात येत आहे.

I. मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ च्या अधीन राहून पदोन्नतीच्या कोटयातील सर्व रिक्त पदे दि.२५/५/२००४ स्थित सेवाज्येष्ठतेनुसार, निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात भरण्याबाबत सा.प्र.वि.(१६-ब) कार्यासनाच्या दि.७/५/२०२१ च्या शासन निर्णयानुसार दिलेल्या सूचनांनुसार सदर मान्यता देण्यात येत आहे. तसेच दि.७/५/२०२१ च्या शासन निर्णयाप्रकरणी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे आव्हान देण्यात आलेले असून त्यावरील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून सदर सहमती देण्यात येत आहे.

II. उपरोक्त पदोन्नती ही कार्यालय अधिक्षक, गट-ब (राजत्रित) संवर्गाच्या अंतिम जेष्ठतेच्या व त्यामध्ये होणाऱ्या बदलांच्या अधीन राहील व या पदोन्नतीमुळे वरील अधिकाऱ्यांना सदर पदोन्नतीच्या दिनांकापासून जेष्ठतेचा हक्क मागता येणार नाही.

III. महाराष्ट्र नागरी सेवा (जेष्ठतेचे विनियमन), नियमावली २०२१ मधील नियम २ (ड) मधील तरतुदीनुसार, पदोन्नतीने नियुक्ती होणाऱ्या सदर अधिकाऱ्यांनी पदोन्नतीचे आदेश निर्गमित झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसांच्या विहित मुदतीमध्ये रुजू होणे आवश्यक राहील.

iv) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.३१०/का-१२, दि.१५/१२/२०१७ मधील तरतुदीनुसार विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीच्या दिनांकाला निलंबित आहेत किंवा त्यांचेविरुद्ध शिस्तभंग विषयक कार्यवाहीच्या अनुषंगाने दोषारोप बजावून शिस्तभंग विषयक कार्यवाही चालू झालेली आहे किंवा या अधिकाऱ्यांविरूद्ध फौजदारी आरोपाचे न्यायालयीन प्रकरण प्रलंबित आहेत अशा अधिकाऱ्यांच्या पदोन्नतीच्या प्रकरणात विभागीय पदोन्नती समितीने त्यांची गोपनीय अभिलेखाच्या व इतर सेवाप्रवेश नियमाच्या तरतुदींच्या अनुषंगाने पात्रता तपासली असून या अधिकाऱ्यासंदर्भात विभागीय पदोन्नती समितीने केलेले मुल्यमापन आणि दिलेली प्रतवारी स्वतंत्र पाकीटात मोहरबंद करून ठेवण्यात आली आहे. निवडसुचीमधील ज्ये.क्र. १६ श्री. गोविंदा दत्तात्रय लहामगे यांनी कौटुंबिक कारणास्तव पदोन्नती नाकारत असल्याचे दि.१३.०२.२०२६ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे त्यामुळे त्यांची पदोन्नती नाकारण्यात येत आहे.

v) सदर अधिकाऱ्यांना देण्यात आलेली तात्पुरती पदोन्नती कोणतीही पुर्व सूचना वा नोटिस न देता रद्द करण्याचा अधिकार शासन राखून ठेवीत आहे.

**३.** सदर पदोन्नतीने पदस्थापनेचे आदेश प्राप्त झाल्यापासून तात्काळ पदस्थापनेच्या ठिकाणी हजर होणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कार्यमुक्त केल्यानंतर विहित मुदतीत ते पदस्थापनेच्या ठिकाणी

हजर झाले नाहीत, तर त्यांना सदर पदोन्नतीमध्ये स्वारस्य नाही असे गृहित धरुन शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दि.३०/०४/१९९१ व दि.१२/०९/२०१६ मधील नमूद तरतुदीनुसार शासनस्तरावरुन त्यांची पदोन्नती रद्द करण्यात येईल. तसेच पदोन्नती नाकारणाऱ्या अधिकाऱ्यांना आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत प्रशासकीय अधिकारी पदाचा १२/२४ वर्षाचा लाभ दिला असल्यास तो तात्काळ थांबविण्यात यावा व त्यांना कार्यालय अधिक्षक संवर्गात प्रत्यक्ष पदोन्नतीनंतर सदरचा लाभ देण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

४. पदोन्नत झालेल्या अधिकाऱ्याने कार्यालय अधिक्षक, गट-ब या पदाचा कार्यभार ग्रहण केल्यावर वेतन निश्चितीचा विकल्प तात्काळ द्यावा. असा विकल्प न दिल्यास, त्यांची वेतन निश्चिती महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियमावली १९८१ मधील नियम क्र.११ (१) (ए) नुसार पदोन्नतीचा दिनांक विचारात घेऊन करण्यात यावी.

५. हे आदेश तात्काळ अंमलात येतील. सदर पदोन्नतीने पदस्थापना दिलेल्या अधिकाऱ्यास नियंत्रक अधिकाऱ्यांनी पदोन्नतीच्या पदावर हजर होण्यास तात्काळ कार्यमुक्त करावे. तसेच संबंधित अधिकाऱ्यांना पदोन्नतीच्या पदावर हजर होण्यासाठी कोणत्या दिनांकास कार्यमुक्त केले आणि ते पदोन्नतीने पदस्थापनेच्या ठिकाणी कोणत्या दिनांकास हजर झाले याबाबत संबंधित नियंत्रक अधिकाऱ्यांनी शासनास त्वरीत कळवावे.

६. सदर शासन आदेश, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०२६०५०८१७१२३१०७१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

UDAY CHANDRAKANT DHAGE

Digitally signed by UDAY CHANDRAKANT DHAGE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=d50c7e8b1126d276bbe49105f9d24fff67dc9032e4afab15f5d0d94a0ea6cf5a, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=097E903F6E5707A0A9A3CDAEBE40C9235E8FDA1EE2C8C4EA7713D6497937DCED, cn=UDAY CHANDRAKANT DHAGE
Date: 2026.05.08 17:13:25 +05'30'

**( उदय ढगे )**
**विशेष कार्यकारी अधिकारी,**
**महसूल व वन विभाग, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३. प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, म.रा., पुणे.
४. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कार्मिक), नागपूर.

५. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संशोधन, शिक्षण व प्रशिक्षण), पुणे

६. प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन - दुय्यम संवर्ग), महाराष्ट्र राज्य, नागपूर.

७. सर्व अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक /सर्व मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक / वन्यजीव)

८. महालेखापाल,महाराष्ट्र-१/२ (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र मुंबई/नागपूर

९. सर्व वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण

१०. सर्व उपवनसंरक्षक

११. मा. मंत्री (वने) यांचे खाजगी सचिव

१२. उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग (कार्या.-१२), मंत्रालय, मुंबई-३२

१३. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी

१४. प्रधान सचिव (वने) यांचे स्वीय सहाय्यक.

१५. संबंधित अधिकारी / प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), म.रा.नागपूर यांचे मार्फत.

१६. निवड नस्ती (वने-८ कार्यासन) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२